संचारबंदी दरम्यान आडकून पडलेल्या ट्रक वाहन चालकांना जेवण देवून माणुसकीचे जोपसली

<u>चव्हाण मोटर्स उपक्रमास तालुका पोलीस कडून सहकार्य</u>

संपूर्ण देशात कोरोना विषाणू संसर्ग व प्रादूर्भाव होत आहे. त्यामुळे कोरोना सारख्या महाभयानक विषारी विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखण्यासाठी सध्या देशात व राज्यात लाॅक डाऊन करून संपूर्ण संचारबंदी कर्फ्यु लागू करण्यात आला आहे.

त्यामुळे कालपासून सोलापूर जिल्ह्यात आडकून पडलेल्या ट्रक ड्रायव्हर यांना चव्हाण मोटर्स, सोलापूर यांचे मालक श्री. घनश्याम बाबू चव्हाण यांचे वतीने व सौजन्याने सोलापूर तालुका पोलीस स्टेशनचे मदतीने सोलापूर ते हैद्राबाद हायवे रोडवरील तांदुळवाडी- खानापूर बाॅर्डर या ठिकाणी सुमारे 150 व यावली तालुका मोहोळ या ठिकाणी थांबलेले 50 असे एकूण सुमारे 200 ट्रक ड्रायव्हर यांना जेवण वाटप करण्यात आले आहे.

पर राज्यातील ट्रक चालकांना दिलेल्या जेवणामुळे त्यांना चव्हाण मोटर्स व पोलीस स्टेशनचे आभार मानले.

